# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा वाणिज्य विषयक दृष्टीकोन

**प्रा.कु. कांबळे** सहाय्यक प्राध्यापक ,वाणिज्य विभाग , न्यू कॉलेज ,कोल्हापूर. kulveerbyss@gmail.com

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

**गोषवारा:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाला विविध पैलू आहेत. संविधानाचे शिल्पकार ,पत्रकार ,कायदेतज्ञ, अर्थतज्ञ परंतु बाबासाहेबांनी व्यक्त केलेल्या वाणिज्य विषयक विचाराकडे नेहमी दुर्लक्ष होते. त्यांनी मांडलेल्या विविध सिद्धांताबद्दल क्वचितच चर्चा केली जाते. अर्थशास्त्रात डॉक्टरेट पदवी मिळवणारे पहिले भारतीय म्हणून त्यांनी भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांच्या वाणिज्यविषयक कल्पना सामाजिक न्याय, समानता आणि उपेक्षित समुदायांच्या सक्षमीकरणावर केंद्रित होत्या.

मुख्य शब्द: डॉ .बाबासाहेब आंबेडकर ,व्यापार ,उद्योजकता, भांडवल,शेती ,वित्त

**प्रस्तावना -:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,मानवमुक्तीचे महानायक,प्रकांड पंडित, अर्थशास्त्रज्ञ ,समाजशास्त्रज्ञ, राजकीयशास्त्रज्ञ, स्त्रियांचे मुक्तिदाते,शेतकऱ्यांचे मुक्तिदाते,कामगारांचे मुक्तिदाते, बौद्ध तत्त्वज्ञानाचे भाष्यकार अशी विविध भूमिका बजावणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर विपुल प्रमाणात लिखाण केलेले असून सुद्धा त्यांची जनमानसात अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रतिमा नाही. त्यांच्या विचारांची जागतिक पातळीवर दखल घेतली गेलेली आहे. त्यांनी वेळोवेळी आपल्या भाषणांमधून,लिखाणातून उद्योग, व्यापार,उद्योजकते विषयी चर्चा केलेली आढळते. हा शोधनिबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वाणिज्य विषयक व्यक्त केलेल्या विचारांचा शोध घेतो.

**संशोधन हेतू :**

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वाणिज्य विषयक विचारांचा अभ्यास करणे.
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखाणातील वाणिज्य विषयक विचारातील सुसंगतता समोर आणणे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोध निबंध लेखनासाठी वर्णनात्मक संशोधनपद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत :**

सदर शोध निबंध दुय्यम साधन सामग्रीच्या सहाय्याने लिहिण्यात आलेला आहे. यांसाठी उपलब्ध संदर्भ ग्रंथ, इंटरनेट मासिके यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण :**

**प्राचीन भारतातील व्यापार**

१९१३ ते १९१५ या कालावधीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एम .ए ,च्या परीक्षेसाठी प्राचीन भारतातील व्यापार या विषयावर शोध निबंध त्यांनी तीन भागामध्ये तयार केलेला होता. १) मध्यपूर्व भारतातील व्यापार संबंध २) मध्य युगातील भारतातील व्यापार संबंध ३)ब्रिटीश सरकारच्या पूर्वीचा भारत.

१) मध्यपूर्व भारतातील व्यापार संबंध:

या शोध निबंधामधील या प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यापाराच्या अनुषंगाने महत्त्वपुर्ण बाबी मांडतात. सुरुवातीच्या काळात भारतामध्ये अंतर्गत व बाह्यगट व्यापाराचे महत्त्व इतके वाढले होते की जातक कथांमध्ये आपणास कारवा/सार्थवाह नेत्यांच्या संघटनांचा उलेक्ख आढळतो. हे सार्थवाह प्रवासामध्ये व्यापाऱ्यांना मदत करीत असत.कुठे थांबायचे,कुठे पाणी प्यायचे,चोरांपासून कशी काळजी घ्यायची,कोणत्या वाटेने प्रवास करावा इ.हे सार्थवाह रात्रीचा प्रवास करीत असत. प्राचीन भारतातील व्यापार हा संपूर्णत: व्यक्तिगत स्वरूपाचा नव्हता, काही प्रमाणात का असेना तो भागीदारी स्वरूपाचा होता.व्यापारावर सरकारी नियंत्रण हे नाममात्र होते. ते महत्त्वपुर्ण प्रश्न उपस्थित करतात प्राचीन भारतातील साहित्यामध्ये अर्थशास्त्राचे विज्ञान या बाबीवर कोणत्याही प्रकारच्या साहित्य निर्मिती का करण्यात आलेली नाही ? त्यामुळे आपणास या बाबतीत विदेशी लेखकांनी जे लिखाण केलेले आहे त्यावर अवलंबून राहावे लागते. प्राचीन भारतातील आर्थिक संस्थांच्या बाबतीत बुद्धाच्या जातक कथांमधून या आर्थिक संस्था जातक कथा लिहिण्याच्या पूर्वी पासून अस्तित्वात होत्या हा संदर्भ मिळतो. प्राचीन काळामध्ये सामाजिक पातळीवर शेती हा सर्वश्रेष्ठ व्यवसाय समजला जात होता, त्यानंतर व्यापाऱ्यांना दुसरे स्थान तर सैनिकांना अंतिम स्थान दिले गेलेले होते.

भारतामध्ये पैशाची ओळख ही देशातून झाली की विदेशातून हा विरोधाभासाचा विषय आहे. बौद्ध साहित्यामधून हे प्रतीत होते की वस्तूंचा विनिमय ही जुनी प्रथा होती.कालांतराने वस्तूच्या विनिमयाचे स्थान हे धातूच्या नाण्याने घेतले.चलनाचे मध्यम म्हणून मोठ्या प्रमाणात सोन्याची नाणी अस्तित्वात होती.परंतु या चलनावर सरकारचे नियंत्रण नव्हते.बँक प्रणाली विकसित नव्हती. कर्ज देण्यावर कोणत्याही प्रकारचे बंधन नव्हते.

वाणिज्य /व्यापार संस्कृतीचे अनुसरण करीत असते.प्राचीन काळातील व्यापारी इतर देशांशी व्यापार करताना सोबत आपली संस्कृती ही घेऊन जात असत. व्यापाऱ्यांनी संस्कृतीचा प्रचार केला आणि संस्कृतींना विश्वव्यापी बनवले.भारताशी असलेल्या व्यापारी संबंधांचा इजिप्तच्या वास्तुकलेवर इतका प्रभाव पडला की तेथील दगडी खांब हा भारताच्या प्रेरणेने बनलेला आहे.विचार जरी इजिप्तचा असला तरी कल्पना भारतीय होती.बुद्धगयेतील विहार हे भारतीय कला व इजिप्तमधील कला यांचे विलक्षण संयोग आहे.प्राचीन काळी जेंव्हा दोन लोक संपर्कात येत असे तेंव्हा ते आपल्या वास्तुकलेला व्यावसायिक एकीकरणाचे प्रतिक बनवत असत. भारत व पश्चिम देशामधील व्यापार हा भूमार्ग व समुद्री मार्गाने होत होता.

**सार्वजनिक वित्त (Public Finance)**

**ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती (Administration and Finance of East India Company)**

या शोध निबंधातून त्यांनी इ.स.१७९२ ते १८५८ या कालावधीमध्ये इस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासन आणि अर्थनीतीच्या धोरणात कसे बदल झाले याचा आकडेवारीसह आढावा त्यांनी घेतला आहे. यामध्ये विशेष बाब म्हणजे कंपनीने भारतीयांचे केलेले शोषण याचा उहापोह केलेला आहे.इस्ट इंडिया कंपनीच्या कामाची पद्धत ही धिक्कारनिय होती असा ते निष्कर्ष काढून भारताच्या सुधारणासाठी एकही पैसा कंपनीने दिला नाही तर भारताकडून ब्रिटीश सरकारला नियमित पणे १०० दशलक्ष स्टर्लिंग सारखी भलीमोठी रक्कम आताच्या काळानुसार दिली गेली आहे.हे खंडणी सारखेच आहे. इंग्लडने भारतात सोन्या-चांदीच्या स्वरूपातील भांडवलात काही भर न टाकता भारताला मोठ्या प्रमाणात बुडवले. या शोध निबंधातून त्यांनी भारताच्या विकासाकडे दुर्लक्ष करून भारताची लुट करण्याकडे कसे लक्ष केंद्रित केले हे दाखवून दिले आहे.

**ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती (The Evolution Province Finance in British India)**या ग्रंथातून त्यांनी १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालावधीचा राजकोषीय आढावा घेतलेला आहे. भारतीय शेती ही सरकारी मालकीची असून शेतकरी हा तिचा फक्त कुळ समजून त्याच्याकडून केल्या जाणाऱ्या भरमसाठ शेतसारा वसुलीमुळे शेतीचा विकास कसा ब्रिटिशांनी खुंटवला तसेच जकातीचे उत्पादन व व्यापारावर झालेले परिणाम ते प्रकाशात आणतात, कर आकारणीत कसा सामाजिक न्यायाचा अभाव होता. सैन्यावर भरमसाठ उधळण केल्यामुळे विकास कामांसाठी पैसा उपलब्ध नव्हता हे ते प्रकर्षाने मांडणी करतात.

**रुपयाचा प्रश्न : त्यांचा उदगम व उपाय (Problem of Rupee: It's Origin & It's Solution)** हा प्रबंध १९२३ साली पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला. या ग्रंथाने मौद्रिक अर्थशास्त्रामध्ये (Monetary Economics)मोलाची भर घातलेली आहे. या पुस्तकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय चलनाच्या विनिमयाचे साधन म्हणून विकसित झालेला विकास आणि सोने,चांदी आदि मौल्यवान धातूंच्या संदर्भातील त्याची सममूल्यता त्यांचा विस्तृत व सखोल आढावा घेतला आहे. तसेच भारतासाठी योग्य चलन पद्धती कोणती असावी या बहुचर्चित प्रश्नावर आपले लक्ष केंद्रित करतात .या ग्रंथामध्ये जॉन केन्स या अर्थशास्त्रज्ञ यांनी जो चलन विषयक सिद्धांत मांडलेला होता तो त्या काळामध्ये प्रमाण मानला जात होता.तो सप्रमाण खोडून काढत रुपया स्थिर कसा राहील याबाबत मूलगामी विवेचन या ग्रंथामध्ये मंडळे आहे. रुपयाचा प्रश्न हा चलन फुगवटा व महागाईशी निगडीत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता तो चलन निर्मितीवर प्रभावी अंकुश ठेवू शकेल अशी यंत्रणा निर्माण करण्याचा.याच धरतीवर रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्याची शिफारस हिल्टन कमिशनला करावी लागली.आजच्या परिस्थितीमध्ये Physical Currency व Digital Currency यांची तुलना सुवर्ण विनिमय प्रमाण व चांदी विनिमय प्रमाण यांच्याशी करायला हवी.

**उद्योजकता प्रोत्साहन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१७ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून परतल्यानंतर आपल्या अर्थार्जनासाठी Stocks and Shares Advisors या नावाने कंपनी सुरू केली. Stocks व Shares यांच्याबद्दल मोठ्या प्रमाणात व्यापार करणाऱ्या शेटीया-भाटीयांना व कंपन्यांना सल्लामसलत देण्याचा उद्योग त्यांनी सुरु केला.हा व्यवसाय सुरुवातीला चांगला चालल्यामुळे नफा मिळाला. पण,ज्या क्षणी ग्राहकांना लक्षात आले ही सल्लामसलत करणारी कंपनी निम्न जातीतील व्यक्तीची आहे हे समजल्यानंतर लोकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे जाणे बंद केले आणि शेवटी ही कंपनी नाईलाजास्तव बंद करावी लागली. जातीव्यवस्थेच्या संकुचित मानसिकतेमुळे कंपनी बंद झाली होती. परंतु बाबासाहेब हे

चांगले सल्लागार असल्यामुळे भविष्यकाळात कंपनीने मोठे नाव कमावले असते पण या तत्कालीन समाजव्यवस्थेला ते मान्य नव्हते.

उद्योजकीय प्रक्रिया आणि बाजार अर्थव्यवस्थेशी परिचित व्यवसायाच्या प्रक्रियेची आणि कायदेशीर बाबींविषयी त्यांना सखोल ज्ञान होते. बाजारपेठेमध्ये टिकून राहण्यासाठी नेमके काय केले पाहिजे याची स्पष्ट कल्पना त्यांना होती. त्यांच्यामध्ये एक यशस्वी उद्योजका इतकी व्यवसाय चालविण्याची व त्यासाठी इतरांना तयार करण्याची क्षमता होती. चांगल्या पर्यायांच्या अभावी ते बॉटली बॉय अकाउंटन्सी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये अर्धवेळ व्याख्याता म्हणून ही रुजू झाले. जून १९२५ ते मार्च १९२८ या काळात ते या संस्थेशी संलग्न होते. डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या वैयक्तिक जीवनातील काही अशी उदाहरणे आहेत की ते उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याच्या बाजूने होते. उदा. त्यांचा मुलगा यशवंत आणि पुतण्या मुकुंद नावे यांनी काही उद्योजक क्रियाकलापांची निवड करावी त्यासाठी त्यांना मूलभूत बँकिंग आणि व्यवसायाची कौशल्ये आत्मसात करण्याचा सल्ला त्यांनी दिला. त्यासाठी बाबासाहेबांनी त्यांचा पारशी मित्र नवल भाथेना यांना प्रशिक्षण देण्याविषयी व कोणतातरी व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत करावी अशी त्यांना नम्रविनंती केली. परंतु या प्रयत्नांना त्यांना यश येवू शकले नाही. दुसऱ्या एका प्रसंगामध्ये त्यांनी त्यांच्या सोबत कार्यरत असणाऱ्या चळवळीच्या एका सहकारी कार्यकर्ता श्री.बळवंतराव हणमंतराव वराळे यांना तंबाखूचा व्यापार सुरू करण्यासाठी रु.३५,००० चे प्रारंभिक भांडवल प्रायोजित केले. निपाणी येथील अस्पृश्य लोकांना तंबाखुचा व्यापार करण्यासाठी बाबासाहेबांनी अधिकृत परवानगी (लायसन) ही काढून दिलेले होते त्यासाठी त्यांनी संबधित व्यवसायामध्ये प्रस्थापित असणाऱ्या काही लोकांशी पत्रव्यवहारही केला होता. मद्रास क्षेत्रातील कंपन्या उत्पादनांच्यासाठी खरेदीदार प्राप्त करण्यामध्ये तो काही प्रमाणात यशस्वीही झाला व दीर्घकाळ चालला.

दि .२६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी सोलापूर येथे भरलेल्या वतनदार महार परिषदेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना व्यवसाय करण्याविषयी मार्गदर्शन करतात. ते म्हणतात, "गावात राहिल्यामुळे तुम्हाला कोणताच व्यवसाय करता येत नाही.परंतु तुम्ही जर तुमची एकत्रित वसाहत स्थापन केली तर तुम्हाला सर्वच प्रकारचे मार्ग मोकळे होतील.तुम्हाला किराणा मालाचे दुकान घालता येईल, शिंप्याचे दुकान घालता येईल,जो उद्योग तुम्हाला गावात राहून करता येत नाही तोच उद्योग निराळी वस्ती किंवा वसाहत केल्यानंतर तुम्हाला करावयास सापडेल. तुम्हा सर्वच लोकांना शेतीवर उपजीविका करता येईल इतके मोठे क्षेत्र सापडणे कठीण आहे. तेंव्हा शेतीला जोडून दुसरा काही तरी धंदा तुम्ही लोकांनी करणे अवश्य आहे.महार जात ही धंदेवाईक जात नाही.अर्थात तिला जो धंदा करता येईल तो धंदा तिने करण्यास काही हरकत नाही. तुम्हा लोकांना आमची शिफारस आहे की ,तुम्ही खादी विणा. तुम्हा लोकांना कदाचित असे वाटेल की , आम्ही विणलेली खादी घेणार कोण ? व ती जर कोणी घेतली नाही तर खादी विणल्याचा उपयोग काय ? तेंव्हा तुम्ही लोकांनी खादीचे कपडे वापरण्याचा निश्चय केला आणि तुम्ही विणलेल्या शिवाय दुसऱ्या कोणाकडून खादी घ्यावयाची नाही अशी जरी शपथ घेतली तर तुम्हा विणकरांना स्वजातीची इतकी मोठी गिऱ्हाईकी होईल की ते तुम्हाला पुरून उरेल." या परिषदेमध्ये अनेक ठराव पास करण्यात आले. त्या पैकी एक ठराव हा असा होता, "प्रत्येक जिल्हा वतनदार महासंघाने सहकारी मंडळ स्थापन करण्याची. सुत कातणे व कापड विणणे या कामांचा प्रसार करण्याची व सहकारी शेतवर्ग वसाहती स्थापन करण्याची शक्य तितक्या लवकर व्यवस्था करावी." हे त्या काळातील डॉ.बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना प्रतिपादित केलेले हे व्यवसायाचे प्रतिमान (Model) होते. या प्रतिमांनाद्वारे अनुयायांनी आपला आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करावी अशी त्यांची इच्छा होती.

१५ ऑगस्ट १९३६ च्या टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करण्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. यामध्ये पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. या जाहिरनाम्यामध्ये उद्योग,व्यवसाय,कर यांच्याशी संबंधित बाबी पुढीलप्रमाणे होत्या.

1.शेतीची प्रगती होवून तो धंदा जास्त फलद्रूप व्हावा म्हणून लँड मॉर्गेज बँका, उत्पादक शेतकरी वर्गाच्या सहकारी पतपेढ्या व खरेदी विक्री करणारी मंडळे स्थापन करणे.

2.लोकहितासाठी दृष्टीने आवश्यक प्रसंगी देशातील उद्योगधंद्याची मालकी व व्यवस्थापन सरकारने आपल्याकडे घ्यावी असे या पक्षाचे मत आहे.

3.देशातील जनतेकडून कराच्या स्वरूपाने यावयाचा मुबलक प्रमाणात पैसा असेल तर स्वराज्याची हमी घेता येते. कर कमी झाला पाहिजे तरच त्यात तुमचे हित आहे या मताचा बहुजन समाजात प्रसार करणे म्हणजे अज्ञान व गरीब जनतेची

फसवणूक करण्यासारखी आहे. सद्यस्थितीतील जी कर पद्धती आहे ती पद्धत पक्षाला नापसंत असून गरीब वर्ग त्यामध्ये चिरडून जात आहे ही विषमता दूर करण्याचा व ती सुधारण्याचा प्रयत्न पक्ष करील.

या पक्षाच्या जाहिरनाम्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या देशातील शेतकरी,शेतमजूर कामगार व वंचितांच्या जीवनामध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणावयाचा होता असे एकंदर दिसून येते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्रातील लोकांनी उद्योग व्यापारामध्ये उतरण्याचे आवाहन करून ते तरुणांना म्हणतात, सर्व गोष्टी लक्ष्मीबाईच्या चमचमाटाने चालतात. तेंव्हा तरुणांनो! लेखणीला व्यापाराची जोड द्या, पैसा मिळवा.

**राज्य समाजवाद (State Socialism)**

राज्य आणि अल्पसंख्यांक या निवेदनामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्योगाचे मुलभूत व पायाभूत असे दोन प्रकार मानतात. मुलभूत असणारे उद्योग हे राज्य सरकारच्या मालकीचे राहतील आणि ते राज्य सरकार चालवील तर पायाभूत उद्योग हे राज्य सरकार किंवा राज्य सरकारने केलेले महामंडळ चालविल अशी मागणी करतात.तसेच विम्याला राष्ट्रीय उद्योग घोषित करण्याची तसेच प्रत्येक नागरिकांनी त्याच्या ऐपतीप्रमाणे विमा उतरविण्याची मागणी केलेली आहे. शेती हा राज्याचा राष्ट्रीय उद्योग असावा.सामुदायिक शेती केली जावी, गावात कुणी शेतीचा मालक नाही,कुळ नाही, कुणी भूमिहीन नाही असे त्यांना वाटत होते. शेतीसाठी अवजारे व आवश्यक ती साधने पुरविण्याची जबाबदारी त्यांनी सरकारवर टाकलेली होती.भारताच्या आर्थिक विकासासाठी राज्य समाजवाद ही संकल्पना डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली होती.परंतु त्याच्याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही.राज्य समाजवादाची संकल्पना आजही तितकीच गरजेची आहे.

**सावकाराच्या पाशातून मुक्तता**

सावकारशाहीची पद्धती या देशामध्ये सर्वात प्राचीन प्रथा आहे. मनुस्मृतीमध्ये वैश्यांना सावकारीचा धंदा करण्याची परवानगी दिलेली होती.या देशातील वंचित ,बहिष्कृत लोक या प्रथेचे बळी होते हे लक्षात आल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे पार पडलेल्या कुलाबा जिल्ह्याच्या बहिष्कृत वर्गाच्या परिषदेमध्ये “दुष्काळ ,अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी व सावकाराच्या मगरमिठीतून सुटण्यासाठी सहकारी गल्ले स्थापन करावे” अशी विनंती केलेली होती. हे सहकारी गल्ले म्हणजे आजचे बचत गट होय. बचतीच्या बाबतीमध्ये उदासीन असलेला हा वंचित समाज हा सहकारी गल्ले स्थापन करण्याचा फंदात पडला नसावा. या सावकारांनी शासनाकडून आपल्या सावकारी व्यवसायाची परवानगी काढून तिचे प्रत्येक वर्षाला नूतनीकरण करावे अशी भूमिका डॉ.बाबासाहेबांनी मांडली.

**शेती आणि औद्योगिकीकरण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जर्नल ऑफ दि इंडियन इकॉनॉमिक सोसायटी या ख्यातनाम नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झालेला लेख “भारतातील लहान जमीनधारणेची समस्या आणि त्यावर उपाय” हा १९१८ साली प्रसिद्ध झालेला होता. या निबंधामध्ये त्यांनी शेतीविषयी उत्पादकता कमी आहे हे विविध देशांच्या आकडेवारी वरून दाखवून दिले आहे. ते शेतीला आर्थिक उद्योग गृहीत धरतात. लहान धारण क्षेत्रे ही शेतीची समस्या नसून भांडवल व इतर साधन सामग्रीचा तुटवडा ही खरी समस्या आहे.धारण क्षेत्रांचे आकारमान मोठे करणे हा भारतातील शेतीसमस्येवर उपाय नसून भांडवल व तत्सम साधन सामग्रीचा उपाय वाढविणे हाच खरा उपाय आहे. ज्या ज्या क्षेत्रात अतिरिक्त उत्पादन होत असते तिथे बचत केली जाते.त्या बचतीमधूनच भांडवल निर्मिती होवू शकते.भारतातील शेतीमधून अतिरिक्त उत्पादन होत नसल्यामुळे भांडवलाचा तुटवडा निर्माण होतो ही शेतीची खरी समस्या आहे.शेतीक्षेत्रातील मोठी लोकसंख्या व प्रत्यक्ष लागवडीखालील जमिम्नीचे अत्यल्प प्रमाण यामुळे स्वाभाविकपणे शेतीखेत्रातील काही लोकसंख्या अतिरिक्त व बेकार राहते असे ते प्रतिपादन करतात. बाबासाहेब बेकार कामगार व निरुपयोगी भांडवल याची चर्चा करतात.निरुपयोगी कामगाराची ते भारतात्तील एक रोग म्हणून संभावना करतात. त्यावर ते उपाय सुचवितात तो म्हणजे औद्योगिकरण . औद्योगिकरणामुळे त्यांना नोकऱ्या मिळतील. औद्योगिकरणामुळे शेतीच्या खेत्रात असलेले बेकार, श्रम हे इतर खेत्राकडे वळविणे शक्य होते. त्यामुळे कृषीक्षेत्रावरील असलेला भर कमी होणे आणि हे बेकार श्रम इतर उद्योगामध्ये कामी येवून उत्पादन वाढीला आणि त्याद्वारे बचतीला चालना मिळते त्यामुळे अतिरिक भांडवल निर्मिती होणे याचा एकत्रित परिणाम म्हणजे औद्योगिकरणामुळे जमिनीचे तुकडे पाडण्याच्या प्रक्रियेला खीळ बसेल आणि मोठी धारणखेत्रे तयार करण्यासाठी चालना प्राप्त होईल.

**अर्थसंकल्पीय तरतूद**

भंडारा येथे भाषणामध्ये त्यांनी भारतातील प्रजा उपाशी मारत असताना सरकारने सैन्यावर कोट्यावधी रक्कम खर्च करावी ही बाब उचित नाही असे प्रतिपादन करून पंतप्रधानाचे कान उपटले होते. सर्वसामान्य जनता मुलभूत प्रश्नांनी पछाडलेली

असताना संरक्षणाचे बजेट कमी असायला हवे परंतु आजसुद्धा ते बजेट वाढतच आहे. अंदाजपत्रक तयार करताना देशातील सर्वसामान्य जनतेचा प्राधान्याने विचार केला जावा. त्यांच्या विकासासाठी योग्य ती अंदाज पत्रकीय तरतूद केली जावी.

**भांडवलदारांचा नफा किती असावा**

सदर्न इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स ,मद्रास या संस्थेमध्ये मजुरांचे किमान वेतन ठरविण्याचे धोरण सरकारने स्वीकारू नये.मालकांच्या नफ्याची कमाल मर्यादा काय हे ठरविण्याचे धोरण स्विकारावे असे प्रतिपादन केले होते. हा विचार किती स्तुत्य असला तरी प्रत्यक्षात राबविणे कठीण आहे.

**निष्कर्ष:**

1. प्राचीन भारतातील व्यापार हा ज्या देशाशी व्यापारी संबंध होते त्या देशातील संस्कृतीचे अनुसरण करीत असे व्यापारी इतर देशांशी व्यापार करताना आपली संस्कृती सोबत घेऊन जात असत.या व्यापाऱ्यांनी संस्कृतीचा प्रसार केला आणि संस्कृती विश्वव्यापी बनवली.
2. भारतीय समाजाच्या कल्याणासाठी सार्वजनिक वित्ताची संकल्पना मांडण्यात आलेली दिसून येते.
3. सल्लामसलत करण्यासाठी स्थापन केलेली कंपनी, चळवळीतील सहकाऱ्यांना व्यवसाय उभारण्यासाठी केलेली भांडवलीची मदत, आपल्या अनुयायांनी स्वतंत्रपणे व्यवसाय सुरु करावा यामधून ते उद्योजकतेच्या समर्थनार्थ होते.
4. या देशातील नागरिकांना जातीनिष्ठ व्यवसायाचा पुरस्कार नाकारून कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे अशी मागणी करून त्यांनी जातीचे अर्थशास्त्र नाकारले.
5. या देशातील वंचित ,उपेक्षित असलेल्यांना शेती, व्यापार व पांढरपेशा उद्योगांची मागणी त्यांनी केली.
6. सावकारमुक्ती साठी सहकारी गल्ले राबविण्याची त्यांनी योजना मांडली.
7. स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यातून सर्व सामान्य लोकांच्यासाठी आर्थिक विकासाचा कार्यक्रम त्यांनी दिला.
8. अंदाजपत्रक हे सर्वसामान्य नागरिकांचा विचार करून केले जावे, संरक्षणावर वारेमाप खर्च करण्यात येवू नये.
9. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वाणिज्यविषयक विचार हे घटकांना सामावून घेणारे होते. ते केवळ मालकाच्या नफ्याचा विचार न करता व्यवसायातील कामगारांचा सर्वव्यापी विचार करणारे होते.

**संदर्भ ग्रंथ –:**

1. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड १,कालखंड १८९१-१९२० लेखक- चांगदेव भवानराव खैरमोडे, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ ,पुणे. सातवी आवृत्ती एप्रिल २०१३.
2. डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १२, प्राचीन भारतातील व्यापार, प्रकाशक-चरित्र साधने प्रकाशन समिती, शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन१९९३ .
3. डॉ .आंबेडकरांचा सांगाती, बळवंत हणमंतराव वराळे, विनिमय पब्लिकेशन ,विक्रोळी(पश्चिम),मुंबई ,दुसरी आवृती(पुनर्मुद्रण) ६ डिसेंबर २०२२.
4. डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ ,भाग १, १९२० ते १९३६ प्रकाशक-चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन २००२ .
5. डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड ६ चा मराठी अनुवाद,खंड १ , अर्थशास्त्रावरील प्रबंध आणि इतर लेखन प्रकाशक-चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन २०२१.
6. डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १७ ,भाग २, प्रकाशक-चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन २००३.
7. आंबेडकरी अर्थशास्त्र,बुद्ध: तिसरा पर्याय, लेखक –मोतीराम कटारे, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ ,पुणे. प्रथम आवृत्ती १४ एप्रिल २०१८ .
8. प्रश्न रुपयाचा उत्तर बाबासाहेबांचे, संपादन – विश्वास काश्यप,राजा कांदळकर ,संदीप सारंग, प्रकाशक –मि बुद्धीस्ट फौंडेशन ,दादर,मुंबई.२०२३.
9. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीचिंतन,संपादक –डॉ.माधव जाधव,लोकायत प्रकाशन सातारा, २०१८.
10. प्रज्ञा महामानवाची ,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन भाग २, अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय लेखन ,सारांश ,संपादन आणि अनुवाद डॉ.नरेंद्र जाधव ग्रंथाली प्रकाशन ,मुंबई प्रथम आवृत्ती २०१३.